आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१९ मे २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- शेतकऱ्यांना कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान आणि बियाण्यांची माहिती देण्यासाठी येत्या २९ मे पासून देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियान सुरु होणार

- पृथ्वी निरीक्षण उपग्रह, ईओएस-09 कक्षेत स्थिर करण्यात अपयश आल्याच्या घटनेची चौकशी करण्यासाठी इस्रोची समिती

- भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर आशियाई क्रिकेट परिषदेच्या दोन स्पर्धांमधून बाहेर पडण्याचा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा निर्णय

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्ज हे संघ प्लेऑफमधे दाखल

**आणि**

- मुंबई-गोवा महामार्गावर आज झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू

**<><><><><>**

शेतकऱ्यांना कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान आणि बियाण्यांची माहिती देण्यासाठी येत्या २९ मे पासून देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियान सुरु होणार आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. देशातल्या ७२३ जिल्ह्यांमधे ही मोहीम राबवण्यात येणार असून सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवण्याचं उद्दिष्ट आहे. सुमारे ६५ हजार गावात जाऊन वैज्ञानिकांचं पथक शेतकऱ्यांना यासंदर्भात प्रात्यक्षिकं आणि प्रशिक्षण देईल. जिल्हा पातळीवर या पथकाच्या दररोज तीन बैठका होतील असं त्यांनी सांगितलं….

**होल्ड- बाईट- शिवराज सिंह चौहान**

शेती क्षेत्रामुळे सुमारे निम्म्या लोकसंख्येला रोजगार मिळतो, आणि अन्नसुरक्षेचा पाया घातला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेत, 'विकसित कृषी- समृद्ध किसान' असं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले. २०२३-२०२४ या वर्षात एकूण अन्नधान्य उत्पादन ५५७ लाख टन झालं ते २०२४ -२५ या वर्षात एक हजार ६६४ लाख टनांपर्यंत गेल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ उद्दीष्ट पूर्ततेसाठी डिजिटल सार्वजनिक खरेदी व्यासपीठ - सरकारी ई-मार्केटप्लेस हे एक महत्त्वाचे इंजिन आहे, असं मत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी एका इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेखात नमूद केलं आहे. सरकारी ई मार्केटप्लेसमुळे भ्रष्टाचार निर्मूलन झालं आहे. तसंच लहान शहरांमधील विशेष करून वंचित आणि मागास घटकांना सक्षम केलं आहे. करदात्यांच्या पैशांची मोठ्या प्रमाणात बचत केल्याचंही गोयल यांनी या लेखात म्हटलं आहे.

<><><><><>

भारत आणि पाकिस्तान यांच्यातला शस्त्रसंधी काल संपल्याचा दावा करणारं वृत्त भारतीय लष्करानं फेटाळून लावलं. भारत आणि पाकिस्तान यांच्या सैनिकी कारवाई महासंचालकांमधे १८ मे रोजी कोणत्याही प्रकारची चर्चा झाली नाही, १२ मे रोजी दोन्ही देशांनी शस्त्रसंधीचा निर्णय घेतला होता, शस्त्रसंधी संपण्याची कोणतीही तारीख निश्चित केलेली नाही, असं लष्करानं स्पष्ट केलं. या चर्चेत दोन्ही देशांनी शस्त्रसंधीचं उल्लंघन करू नये, एकमेकां◌विरोधात कोणतंही आक्रमक वक्तव्य करू नये, असं ठरलं होतं. सीमाभागात तैनात केलेल्या सैन्यात कपात करावी असंही ठरलं होतं, असं लष्करानं सांगितलं.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.

राजस्थानच्या जोधपूर इथं केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटनमंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या नेतृत्वाखाली आज तिरंगा यात्रा काढली होती. यात्रेत सहभागी झालेल्या नागरिकांनी एक देश, एक धडकन अशा घोषणा दिल्या. भारतीय सशस्त्र दलांच्या शौर्य आणि पराक्रमाचा सन्मान करण्यासाठी हिमाचल प्रदेशातल्या पांगी परिसरात तिरंगा यात्रेचं आयोजन केलं होतं. यात मोठ्या संख्येनं नागरिक सहभागी झाले होते.

**<><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आजपासून सहा दिवसांच्या नेदरलँड्स, डेन्मार्क आणि जर्मनीच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यादरम्यान ते या तिन्ही देशांच्या नेत्यांची भेट घेतील आणि द्विपक्षीय संबंध, तसंच स्थानिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा करतील. युरोपीय देशांबरोबर धोरणात्मक भागीदारी, व्यापार, गुंतवणूक क्षेत्रात सहकार्य वाढवणं हा या दौऱ्याचा उद्देश आहे.

**<><><><>**

माजी राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात त्यांना आदरांजली वाहिली. देशाचे सहावे राष्ट्रपती म्हणून नीलम संजीव रेड्डी यांनी २५ जुलै १९७७ पासून २५ जुलै १९८२ पर्यंत काम पाहिलं होतं.

**<><><><>**

पीएसएलव्ही अग्निबाणाद्वारे पृथ्वी निरीक्षण उपग्रह, ईओएस-09 कक्षेत स्थापित करण्यात अपयश आल्याच्या घटनेची चौकशी करण्यासाठी इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने एक समिती स्थापन केली आहे. इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन म्हणाले की, समितीने काल व्यापक चर्चा केली. संबंधित अग्निबाणाने चारपैकी पहिले दोन टप्पे यशस्वीरित्या पूर्ण केले मात्र तिसऱ्या टप्प्यात एक विसंगती आढळून आली आणि मोहीम पूर्ण होऊ शकली नसल्याचं डॉ.

नारायणन यांनी म्हटलं आहे. इस्त्रो आपले प्रक्षेपण कार्यक्रम पुढे सुरू ठेवणार असून या वर्षी दर महिन्याला एक मोहीम नियोजित करण्यात आली असल्याचं डॉ. नारायणन यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आशियाई क्रिकेट परिषदेच्या दोन महत्त्वाच्या स्पर्धांमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. श्रीलंकेत पुढच्या महिन्यात होणाऱ्या विमेन्स इमर्जिंग टीम्स एशिया कप आणि सप्टेंबर महिन्यात भारतात होणाऱ्या पुरुषांच्या आशिया चषक स्पर्धेत भारत आता खेळणार नाही.

**<><><><><>**

आयपीएल च्या काल झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्जच्या विजयामुळे दोन्ही संघांना प्लेऑफचं तिकीट मिळालं, तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनंही अंतिम चार संघांमध्ये स्थान मिळवलं आहे. शनिवारी बेंगळुरूमध्ये पावसामुळे सामना रद्द झाल्यानं गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सचा संघ स्पर्धेतून बाद झाला. आता उर्वरित एका प्लेऑफ स्थानासाठी मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात चुरशीची स्पर्धा आहे. अव्वल स्थानावर असलेला गुजरात टायटन्सचा संघ टॉप-२ संघांमध्ये स्थान मिळवण्यासाठी सर्वात प्रबळ दावेदार आहे. २०१४ नंतर पंजाब किंग्जनं पहिल्यांदाच प्लेऑफमध्ये प्रवेश केला आहे. उर्वरित दोन्ही सामने जिंकले तर, पंजाब किंग्ज टॉप-२ च्या शर्यतीत टिकून राहील. मुंबई इंडियन्सला प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्स विरुद्धचे दोन्ही सामने जिंकावे लागतील. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी लखनऊ सुपर जायंट्स संघाला सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध मोठ्या फरकानं विजय मिळवणं आवश्यक आहे.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयानं शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म भरण्याचा सराव करण्यासाठी नोंदणी आणि महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरण्याची संधी मिळेल. २० मे रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हे सराव अर्ज उपलब्ध असतील. प्रवेशासाठी अंतिम अर्ज २१ मे ते २८ मे या कालावधीत भरता येतील. विद्यार्थी कमीतकमी १ आणि जास्तीतजास्त १० महाविद्यालयांच्या नावाचा पसंतीक्रम देऊ शकतात. तात्पुरती गुणवत्ता यादी ३० मे रोजी प्रसिद्ध केली जाईल. काही आक्षेप असल्यास विद्यार्थी १ जून पर्यंत तक्रार निवारण पोर्टलवर तक्रार दाखल करू शकतात. अंतिम गुणवत्ता यादी ३ जून रोजी प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती संचालनालयानं दिली आहे.

<><><><><>

बलुचिस्तानच्या किल्ला अब्दुल्ला जिल्ह्यात जब्बार मार्केटजवळ झालेल्या बॉम्बस्फोटात ४ जणांचा मृत्यू झाला, तर २० जण जखमी झाले. स्फोटानंतर फ्रंटिअर कोअर आणि अज्ञात बंदूकधाऱ्यांमध्ये चकमकही झाली. सुरक्षादलांनी या भागात नाकेबंदी करून शोधमोहीम राबवली.

<><><><><>

गियाना मधल्या स्पार्टा इथल्या एसेक्विबो किनाऱ्यावरच्या सीता राम राधे श्याम मंदिरात हनुमानाची १६ फूट उंचीची एक मूर्ती स्थापित करण्यात आली आहे. श्रद्धा, मैत्री आणि दृढतेचं प्रतीक असणारी ही मूर्ती भारतातून आयात करण्यात आली असून तीन दिवसांच्या धार्मिक विधींनंतर काल मंदिरात तिची प्रतिष्ठापना करण्यात आली. या प्रदेशातल्या हिंदू धर्मियांनी एकत्र येत प्रवचन, भजन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आपल्या एकतेचं दर्शन घडवलं.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर आज झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. मुंबईहून देवरुखला जाणारी कार चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे रत्नागिरीजवळ जगबुडी नदीत कोसळली. या अपघातात चालक गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणाचा पुढचा तपास सुरू आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रासह केरळ, कर्नाटक आणि गोव्यात पुढच्या पाच दिवसांत जोरदार ते मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><><>//**